॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

जनसंपर्क विभाग

# विद्यापीठातील एम.ए. पत्रकारितेसाठी आज प्रवेश पूर्व परीक्षा

जळगाव दि. ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील जनसंवाद आणि पत्रकारिता विभागातील एम.ए. जनसंवाद आणि पत्रकारिता या दोन वर्षीय पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षासाठी प्रवेश पूर्व परीक्षा (सी.ई.टी) आज दिनांक १८ जून २०१९ रोजी घेण्यात येणार आहे.

एम.ए. जनसंवाद आणि पत्रकारिता या दोन वर्षाच्या अभ्यासक्रमाला कोणत्याही विद्याशाखेचा पदवीधर विद्यार्थी प्रवेश घेऊ शकतो. प्रवेशाकरीता प्रवेश पूर्व परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे. विभागातर्फे ही प्रवेश पूर्व परीक्षा उद्या मंगळवार, दि.१८ जून २०१९ रोजी सकाळी ११.०० ते १.०० या वेळेत विभागात घेण्यात येणार आहे. पदवी परीक्षेला ॲपीयर विद्यार्थी देखील ही परीक्षा देवू शकतात.

प्रवेश पूर्व परीक्षेसाठी मागासवर्गीय संवर्गातील विद्यार्थ्यांसाठी (एस.सी., एस.टी., एन.टी., व्ही.जे.एन.टी., एस.बी.सी., एस.ई.बी.सी., ई.डब्ल्यू.एस.) रू. १५०/- तर ओ.बी.सी. व खुल्या संवर्गातील विद्यार्थ्यांसाठी रू. २००/- नोंदणी शुल्क आहे. प्रवेश पूर्व परीक्षा १०० गुणांची असून लेखी परीक्षा ७० गुणांची असेल. ज्यात वस्तूनिष्ठ प्रश्न ४० गुणासाठी तर विस्तृत प्रश्न ३० गुणांसाठी विचारण्यात येईल. प्रश्न हे चालू घडामोडी व सामान्य ज्ञानावर आधारित असतील. मौखीक परीक्षा २० गुणांसाठी घेण्यात येईल. यात वैयक्तिक मुलाखत व समूहचर्चा घेण्यात येणार आहे. याशिवाय १० गुण अधिकच्या शैक्षणिक गुणवत्तेसाठी राखून ठेवण्यात आले आहे.

एम.ए.एम.सी.जे.ला प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी प्रवेश पूर्व परीक्षेच्या दिवशी सकाळी १०.०० वाजता विभागात उपस्थित रहावे. ज्या विद्यार्थ्यांनी अद्याप नाव नोंदणी केली नाही अशाही विद्यार्थ्यांना परीक्षेच्या दिवशी नावनोंदणी करता येईल. अधिक माहितीसाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी विभागप्रमुख डॉ.सुधीर भटकर यांच्याशी ९४२३४९००४४, ९८६००४६७०६ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन कला व मानव्यविद्या प्रशाळेचे संचालक डॉ.अनिल चिकाटे यांनी केले आहे.

---

जा.क्र. : कबचौ उमवि/१६/हस्तदेय/२०१९ दिनांक : १७ जून, २०१९

प्रति,
मा. संपादक / प्रतिनिधी,
कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी